# University of Mumbai

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०००९८

**क्र.परीक्षा/निकाल कक्ष/१८२९ /२०१६**

**परिपत्रक :—**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, M.K.C.L. या अभिकरणामार्फत परीक्षाप्रवेश अर्ज Online स्विकारण्यात आलेल्या शिक्षणक्रमाचा विद्यापीठाच्या वतीने महाविद्यालयांनी घेतलेल्या अंतर्गत परीक्षांचे गुण Digital University Portal वरून Online पाठविण्याबाबत विद्यापीठ परिपत्रक No. Exam/ Results/1814 of 2016, दि. १० नोव्हेंबर, २०१६ तसेच परिपत्रक क्र.परीक्षा/निकाल कक्ष/१८२३/२०१६ दि. ०२ डिसेंबर, २०१६ अन्वये कळविण्यात आले होते.

याबाबत पुन्हा असे निर्दशनास येते की, उपरोक्त परिपत्रकांप्रमाणे दिलेली अंतिम मुदत संपुष्टात आल्यावर सुध्दा अद्यापही काही महाविद्यालयांकडून त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षांचे गुण पाठविण्यात आलेले नाहीत.

तरी याबाबत पुन:श्च असे कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांनी अद्यापही त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण Online पाठविले नसतील अशा महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण Online पद्धतीने शक्य तितक्या लवकर म्हणजेच कोणत्याही परिस्थितीत हे परिपत्रक मिळाल्यापासून पाच दिवसांच्या आत (२४ डिसेंबर, २०१६ च्या आत) पाठवावेत व त्याची Hard Copy विद्यापीठाकडे जमा करावी.

तसेच ज्या शिक्षणक्रमांचे परीक्षा प्रवेश अर्ज पारंपारिक पद्धतीने Hard Copy स्वरूपात स्विकारण्यात आलेले आहेत या शिक्षणक्रमासाठीचे विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण अद्यापही काही महाविद्यालयांकडून प्राप्त नाहीत. तरी ज्या महाविद्यालयांकडून या शिक्षणक्रमाचे अंतर्गत परीक्षेचे गुण अद्यापही विद्यापीठात सादर केलेले नाही. त्यांनी ते हे परिपत्रक मिळाल्यापासून शक्य तितक्या लवकर म्हणजेच कोणत्याही परिस्थितीत हे परिपत्रक मिळाल्यापासून पाच दिवसांच्या आत (२४ डिसेंबर, २०१६ च्या आत) विद्यापीठाकडे सादर करावेत.

**ज्या महाविद्यालयाकडून त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंर्तगत परीक्षेचे गुण उपरोक्त नमुद मुदतीत विद्यापीठाच्या परीक्षा विभागात प्राप्त न झाल्यास त्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येतील व राखीव ठेवण्यात आलेल्या निकालासंदर्भात पुढे काही बाब उद्‌भवल्यास यांस संबंधीत महाविद्यालयास सर्वस्वी जबाबदार धरून अशा महाविद्यालयांवर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.**

वरील सर्व बाबींची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

स्थळ : मुंबई.
दि. २० डिसेंबर, २०१६.

प्रति :—
संचालक/प्रमुख, विद्यापीठाचे विविध शैक्षणिक विभाग
प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान व व्यवस्थापन महाविद्यालये
प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाचे दुर व मुक्त अध्ययन संस्था, संचालक मान्यताप्राप्त संस्था,
समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र, मानद सल्लागार ठाणे उपकेंद्र

अ. प्रत माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:—
संचालक,संगणकीय सुविधा केंद्र, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ.

ब. प्रत माहितीस्तव अग्रेषित :—
१. समन्वयक, परीक्षा विभाग
२. सर्व उपकुलसचिव परीक्षा विभाग
३. सर्व सहायक कुलसचिव परीक्षा विभाग